२५
रौप्य महोत्सव

धरित्री प्राथमिक विद्यामंदीर नळदुर्ग
धरित्री विद्यालय अलियाबाद




# धरित्री

## रौप्य महोत्सवी

## वर्ष -२०२०

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad



श्री सत्येंद्र राऊत सर
(अणदूर)

# धरित्री प्राथमिक व माध्यमिक विद्यालय
# अलियाबाद, नळदुर्ग
# ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद

# रौप्य महोत्सवी

## वर्ष १९९४ - २०१९

# " धरित्री " स्मरणिका

संपादिका - श्रीम. संगीता शहा
कार्यकारी संपादक - ॲड. देविदास वडगांवकर

## * संपादक मंडळ *

प्रा. सत्येंद्र राऊत
श्री. किरण पाटील
श्री. दयानंद काळूंके
श्री. म. ना. नरे गुरुजी
श्री. सुनिल पुजारी
श्री. संतोष बुरूंगे

श्री. व्यंकट यादव

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

# आधुनिक शिक्षणाने काय मिळावे ?

प्रा.सत्येंद्र संगाप्पा राऊत

मनुष्यमात्राचे जीवन ख-या अर्थाने सुखी व संपन्न होण्याकरिता माणसाला चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षणानेच सर्व स्तरावर प्रगती होते. सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणातूनच माणसाचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व साकारत असते. भूतपूर्व शिक्षण संचालक वि. वि. चिपळुणकर म्हणतात, 'शिक्षण म्हणो वळण होय ! शिक्षणाने मनाला वळण लागते व ते सुसंस्कारित होते. केवळ ज्ञानसंपन्नता म्हणो शिक्षण नव्हे. माहिती, ज्ञान व कौशल्य विकास या त्रयींवर शिक्षण अवलंबून असते. सुसंस्कारित मनच माणसाला प्रगतीच्या अत्युच्च शिखरावर नेऊ शकेल व मन सुसंस्कारित करण्याचे कार्य शिक्षण करते.

'शिक्षण' ही एक अशी संकल्पना आहे की, जी सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे एक महत्वाचे असे साधन आहे. शिक्षणाने काय मिळते ? याहीपेक्षा शिक्षणाने काय मिळत नाही? असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल. कारण आपण आपला इतिहास बघितला तर आपणास लक्षात येते की, अगदी ब्रिटीश राजवटीपासून भारतीयांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवनाचा पायाच जणू शिक्षणाने घातला आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात देखील विविध शैक्षणिक धोरणे राबविण्यात आली व नंतर सर्व प्रगती शिक्षणानेच साध्य झाली आहे. शिक्षणामुळे समाजात नव्याने नवीन आधुनिक अशी मूल्ये, ज्ञान, नवीन श्रध्दा निर्माण झाल्या. ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके आदींच्या प्रसारामुळे व्यक्तींच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्यास मदत झाली. सर्वसाधारणपणे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला वेग आणण्याचे कार्य शिक्षणामुळे सहा शक्य होते.

शिक्षणामुळे संस्कृतीकरण, पाश्चातीकरण, सर्वधर्मसमभावाचे तत्वज्ञान, राष्ट्रीय जागरण, राष्ट्रीय एकात्मता या गोष्टी आत्मसात होऊ शकतात. आज व्यक्तींची, समाजाची, पर्यायाने सर्व राष्ट्राची प्रगती साधण्यास शिक्षणच कारणीभूत ठरते. शिक्षणाने आधुनिक तंत्रे, विज्ञान, आधुनिक विचारसरणी निर्माण झाली. शिक्षण आर्थिक विकास व आधुनिकीकरण यांचा आधार आहे. आा समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीचे साधन म्हणो शिक्षण होय. शिक्षण हा एक असा घटक आहे की, जीवनपध्दतीत आमूलाग्र असे बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य त्यात आहे. त्यामुळे समाजात नवीन संकल्पना अस्तित्वात येतात. शिक्षणाने सांस्कृतीकरण प्रक्रिया सुलभ होते. पाश्चात्तीकरण ही संकल्पनादेखील आपल्याला शिक्षणानेच दिली. पाश्चात्तीकरणामुळे जुन्या रूढी, परंपरा यात परिवर्तन झाले व त्याचे रूपांतर विविध संस्था, वर्तमानपत्रे इ. मध्ये झाले. शिक्षणाने व्यक्तीची बौध्दिकदृष्टया परिपक्व अशा विचारांची बैठक मिळाली.

आधुनिकीकरण ही संकल्पनादेखील शिक्षणानेच दिलेली देणगी आहे. आधुनिकीकरणामुळे पाश्चात्य देशांशी आंतरक्रिया घडवून आणणे, त्यांची मूल्ये संस्कृती, ज्ञान, तंत्रज्ञान यांची सांगड आपल्या संस्कृतीशी घालून त्याचा योग्य असा उपयोग करून



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

आपल्यात विकसित झाली. शिक्षणामुळे व्यक्तीजवळ असलेल्या ज्ञानाचा योग्य असा उपयोग होतो. आज सर्वत्र घडून आलेले बदल, विविध क्षेत्रात झालेली प्रगती, विज्ञानाचे नवीन संशोधन हे सर्व शिक्षणामुळेच घडून आलेले आहे. शिक्षणाने सर्वांच्या मनात सर्वधर्मसमभावाची वृत्ती निर्माण होते. धर्मनिरपक्षतेमुळे बुध्दिनिष्ठतेचा मार्ग सुकर झाला. नवीन विज्ञान, तंत्रज्ञान उदयास आले व पर्यायाने शिक्षणामुळेच भारत एक राष्ट्र म्हणून उदयाला आले. शिक्षण व्यक्तीला एक प्रकारचे वरदानच ठरले आहे. व्यक्तीला सारासार विचार करण्याचीच क्षमता शिक्षणानेच येते. शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनातील एक अविभाय असे अंग आहे.

**हंस: श्वेत:, बक: श्वेत:**
**को भेदो बकहंसयो : ।**
**नीरक्षीर विवेके तु हंसो हंसो,**
**बक: बक : ।।**

याप्रमाणे हंस व बगळा दोघेही शुभ्र आहेत ः मग त्यात भेद तो कोणता ? पाणी व दूघ वेगळे करणारा हंस तो हंसच आहे व बगळा तो बगळाच. या हंसाप्रमाणे चांगले काय/वाईट काय ? योग्य की अयोग्य ? हे सर्व विचार करण्याची दृष्टी आपल्याला शिक्षणं देते.

विद्यार्थी एक प्रकारे मातीचा गोळा असतो. तो मातीचा गोळा सुसंस्कृत, सुशिक्षित शिक्षणाच्याच आधारे होत असतो. त्या गोळयावर त्या विद्यार्थ्यांच्या मनात ध्येय, आकांक्षा, संस्कार, मूल्ये शिक्षणानेच रूावली जातात. जणू काही विद्यार्थ्यांच्या मनोविश्वाला आकार देण्याचे कार्यच शिक्षण करत असते. शिक्षणाने काय मिळावे ? शिक्षणाने काय मिळावे? असा जर विचार केला तर ' शिक्षण ' या शब्दाची व्याप्ती सर्वप्रथम लक्षात घ्यावी लागेल. 'शिक्षण' या शब्दाचा विचार विद्यार्थी या घटकाच्या सर्वांगीण विकासाबाबत करावा लागेल. सर्वप्रथम विद्यार्थ्यांच्या मनात मूलभूत परिवर्तन करण्यापासूनच शिक्षणाला प्रारंभ करावा. आजचे शिक्षण केवळ विद्यार्थ्यांमध्ये 'यशाचा हव्यास ' वाढवत आहे. परंतु असे केल्याने विद्यार्थ्यांचे यश मिळवणे हे ध्येय होत आहे आणि त्यासाठी तांत्रिक कौशल्य यशाचे साधन होत आहे. हे तांत्रिक कौशल्य तात्पुरत्या स्वरूपाचे असतात. अशा पध्दतीत बदल व्हायला हवेत. उलट शैक्षणिक मनोवृत्तीत बदल व्हायला हवेत. गुरू व शिष्य यांची अशी धारणा हवी की, आपण संपादन केलेले ज्ञान "तेजस्विनावधीतमस्तु"

विद्यार्थ्यांमधील कुतूहलाला उत्तोन दिले पाहिजे. त्यामुळे मुलांमध्ये जागरूकता निर्माण होऊन - त्यांच्यात शोधक दृष्टी निर्माण होईल. त्यांना केवळ व्यक्ती-व्यक्तीतच नव्हे तर व्यक्ती आणि समाज - यांच्यात सुसंवादी असे संबंध कसे निर्माण करता येतील हे ज्ञान आज शिक्षणाने व्यक्तीला मिळाले पाहिजे.

आजच्या युगात विद्यार्थ्यांना संयमाचे धडे दिले पाहिजे. विचारपूर्वक, परिणामांचा नीट विचार करणे हे सर्व लक्षात ठेवून योग्य गोष्टी केल्या पाहिजेत. कारण,

सहसा विदधीत न क्रियाम् ,
अविवेकः परं आपदां पदम् ।
वृणुते हि विमृश्यकारिणं गुणालुब्धा ः
स्वयमेय संपदः ।।

विचाराने, संयमाने वर्तन केले तरच सर्वजण गुणांवर लुब्ध होता व त्याला प्रगतीचे मार्ग खुले होतील. शिक्षणाने व्यक्तीत निर्भयता जागृत केली पाहिजे. कारण भीतीचे समूळ उच्चटन झाल्यानेच



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

व्यक्तीमध्ये प्रज्ञेचा उदय होतो. मनात तसेच मानातील गोंधळ संपून सुसंवाद निर्माण होतो. मनात नवे जग, नवीन संस्कृती, जीवन मूल्ये अशा त-हची सृजानशीलता जागरूक करणारे शिक्षण मिळाले पाहिजे.

आज केवळ तांत्रिक शिक्षण देले जाते. असे शिक्षण व्यक्तीला वाकबगार करतेः पंरतु व्यक्तीचे जीवन यांत्रिक व निर्जीव बनत चालले आहे. केवळ माहितीचा संचय म्हणो शिक्षण नव्हे. विद्यार्थ्यांचे मन हे वर्तमानकाळ व भूतकाळ यांचा परिपाक असतो. त्यांच्या मनावर अनेक संकेत, संस्कार लहानपनापासूनच रूजवलेले असतात. चांगले, वाईट, समजण्याची क्षमता त्यांच्या शिक्षणाने निर्माण व्हावी. शिक्षणाने केवळ विद्यार्थ्यांना साचेबंद विचार, तत्व, क्रमिक पुस्तके यांचेच ज्ञान न देता त्यांना जीवनातील शाश्वत अशा मूल्यांची जाणीव करून द्यायला हवी, जेणे करून त्यांचे मन विशिष्ट अशा एकच प्रकारच्या ज्ञानाने बंदिस्त न होता त्यांना सर्वांगीण असे ज्ञान मिळेल.

शिक्षण असे असावे की, मी व माझे यापलीकडेही जाऊन काही तरी आहे व ते जाणून घेण्याची चौकस बुध्दी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. जेणे करून व्यक्तीला जीवनात अतिशय कठीण व गुंतागुंतीच्या समस्या सोडविण्यासाठी सखोल अशी जीवनदृष्टी मिळाली पाहिजे. शिक्षणाने व्यक्तीला निदान स्वतःचे प्रश्न समजून घेऊन सोडवता आले पाहिजेत. शिक्षणाने व्यक्ती विचारशून्य न बनता विचारशील बनली पाहिजे. केवळ परीक्षा देणे, पास होणे व नशिबात असेल तर नोकरी करणे अशी यांत्रिकता देणारे शिक्षण काहीही उपयोगाचे नाही; तर आपल्या अंतःकरणात, मनात तसेच विचारातदेखील सृजनशील अशा मूल्यांच्या अधिष्ठान शिक्षणाने निर्माण करायला हवे. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकासोबतच त्यांना सर्व मूल्ये शिकवली पाहिजेत. त्यांच्या मनात मूल्यांचे संस्कार केले पाहिजेत. त्यामुळे पुस्तकी विद्येपलीकडे जाऊन त्यांच्या कृतीत, वर्तनात त्या ज्ञानाचा उपयोग करता आला पाहिजे. कारण, `**य:क्रियावान् स पण्डित:।**` केवळ शिक्षण घ्यायचे म्हणून शिक्षण घेऊ नये. शिक्षणाने व्यक्ती विद्वान् पंडित झाली पाहिजे.

**``शास्त्राण्यधीत्यापि भवन्ति मूर्खा : ।**
**यस्तु क्रियावान् पुरुष:स विद्वान् ।।``**

शिक्षणाने केवळ शास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी नव्हे, तर त्या शास्त्राचा उपयोग करून घेणारे विद्वान् निर्माण करायला हवेत, घडवायला हवेत. नाहीतर तुकाराम महाराज याप्रमाणे म्हणतात की,

बोलाचीच कढी, बोलाचाच भात
जेवूनिया तृप्त कोण झाला ?

म्हणजे आज सांगण्यापुरतेच किंवा बोलण्यापुरते शिक्षण नको आहे. आपल्या नावासमोर केवळ पदव्या लिहिण्यासाठी किंवा वृथा अभिमानासाठी शिक्षण नको आहे. तर या शिक्षणाने आत्मोन्नती होईल असे शिक्षण मिळायला हवे. व्यक्तीला प्रतिभा व स्वातंत्र्य देणारे शिक्षण हवे.

शिक्षणाने मुक्त व निर्भय मनाच्या व्यक्ती निर्माण कराव्यात. कारण अशाच व्यक्ती समााात सहकार्यपूर्ण वर्तन करतात व नवीन काहीतरी निर्माण करू शकतात. तसेच शिक्षण हे केवळ अनुकरणात्मकदेखील असू नये. कारण अनुकरणात्मक शिक्षण व्यक्तीला लुळे, पांगळे



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

बनवते. कर्मणा रहितं ज्ञानं पंगुना सदृशां भवेत्!

बौध्दिक परिपक्वता देणारे शिक्षण हवे. योग्य विचारक्षमता, बुध्दीचे सामर्थ्य शिक्षणानेच दिले पाहिजे शिक्षण असे असावे की, ख-या अर्थाने सुसंस्कृत व शांततामय अशी समाजरचना निर्माण करणारे व खूप मोठया प्रमाणात परिवर्तन घडवून आणणारे असावे. शिक्षणाने व्यक्तीला सतत प्रोत्साहित केले पाहिजे. केवळ चंचलता देणारे शिक्षण नको आहे. Arise! Awake! And stop not still the goal is archived अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणारे शिक्षण हवे. आयुष्यभर आत्मसात न झालेला व मेंदूत अस्ताव्यस्त कोंबलेला ज्ञानाचा झरा म्हणजे शिक्षण नव्हे : तर माणूस घडविणारे, चांगले विचार आत्मसात करायला लावणारे व योग्य अशा मार्गदर्शकांची भूमिका ठवणारे शिक्षण आज मिळाले पाहिजे.

***

दौड के पाठशाला जाना चाहिए
हँसते - हँसते पढाई करनी चाहिए
गुरुओं का सम्मान करना चाहिए
रुह का हर एक कतरा देश के लिए बहना चाहिए ।

***

स्कुल तो एक मंदिर है
उसमें भगवान की जगह गुरु बसते है
आदर करना उस गुरुओं का
वही हमारा भविष्य उज्वल करते है ।

***

जिंकू आपण सागर
जिंकू आपण पर्वत
धरित्री विद्यालयाचा मान राखायचा असेल
तर होवू नका कधीच
आयुष्यात नर्व्हस.

***

आपल्याला शाळा शिकायची आहे
ते विद्यार्थी बनून
आई वडिलांच्या वचनाचं पालन करायचं
ते मुलगी बनून
आपल्याला धरित्री विद्यालयाचा मान राखायचा
ती आदर्श विद्यार्थी बनून.

***

गुरु और माँ-बाप के कुछ अरमान होते है
उसे पुरा करना हमारा कर्तव्य है
वही कर्तव्य निभाना हमारी पाठशाला की सीख है ।

***

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad